पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे सर्वसमावेशी विकासाचे प्रारुप : एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्या शाखेतील 'अर्थशास्त्र' विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर करण्यात येणारा संशोधन पूर्व आराखडा

संशोधक
राधेशाम बाबुलाल बुंदेलकर
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक
डॉ.दुर्गादास चौधरी
प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि.लातूर.

संशोधन केंद्र
सामाजिकशास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर **2023**

पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे सर्वसमावेशी विकासाचे प्रारुप : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :-

सर्वसमावेशक विकास हे कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासाचे एक प्रमुख निकष म्हणून लक्षात घेतले जाते. भारतीय सर्वसमावेशक विकास ही संकल्पना अलिकडल्या काळामध्ये विशेषत्वाने वापरली जात असली तरी आपल्या

भारतीयांसाठी ती पूर्वपरिचित आहे. भारतामध्ये साहित्य, संस्कृती व प्राचीन आर्थिक धोरणातून ‘वसुधैवकुटुम्बकम्’ या संकल्पनेतील सर्वसमावेशक विचारांची बिजे रूजवलेली दिसतात. भारतामध्ये महात्मा गांधी, राममनोहर लोहिया, पंडीत दीनदयाल उपाध्याय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या विचारातून भारतीय सर्वसमावेशक विकासाचे प्रारुप लक्षात घेता येते. जागतिकीकरणाच्या व आर्थिक सुधारणेच्या स्वीकायामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात स्थित्यंतरे झाली. ही होणारी स्थित्यंतरे मानवी समाज प्रणालीला प्रभावित करणारी ठरली आहेत. अशा स्थितीमध्ये भारताच्या सर्वसमावेशी विकासाचे प्रारुप निश्चित करताना पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानवतावाद या विचारातील सर्वसमावेशी विकासाचे सूत्र सर्वसमावेशी विकासाचे साधन म्हणून उपयोगी ठरतात. म्हणून भारतीय दृष्टिकोनातून सर्वसमावेशी विकासाच्या अनुषंगाने एकात्म मानवतावाद विचारातील सर्वसमावेशी विकासाचा दृष्टिकोन संशोधित करणे आवश्यक ठरते.

इंग्रजाचे परकीय राज्य गेले. मात्र ते गेल्यावरही त्यांचे अंधानुकरण करणे ही सुद्धा एक गुलामीच त्याचे अंगभूत संस्कार संस्कृती त्यांच्या भौतिक व इतर परिस्थितीनुसार आहे. मग आपल्याकडील परिस्थितीतून आलेली संस्कृती आणि संस्कार यांच्यातून आपण प्रगती करायला हवी याच्या विचारातून पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी 1965 साली एकात्म मानवतावादाची संकल्पना मांडली. त्या काळी जगभरात भांडवलवाद आणि कम्युनिस्टवादाचा प्रभाव होता. मात्र या दोन्ही संकल्पनांवर भारतीय, सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था आधारीत असू नये तर भारतीय संस्कृती आणि विचारप्रणालीवर भारताचे आणि जगाचे उद्धार व्हावे यासाठी पंडीत दीनदयाळ यांनी एकात्म मानवतादाची संकल्पना मांडली.

मानवतावादावर जगभरात अनेक सिद्धांताचा जन्म झाला. प्रत्येक सिद्धांत माणसाला माणूस म्हणून जगण्याच्या मर्यादा दाखवतो. पाश्चात्य भांडवलवाद असो,

समाजवाद असो की, कम्युनिस्टवाद असो या सगळया वादांनी माणसामध्ये काही-ना-काही कारण आणि भेद शोधून वादच निर्माण केला. भांडवलवादामध्ये कुणीतरी एक मालक आणि बाकीचे त्याचे आश्रित तर कम्युनिस्टवादामध्ये उधड उधड वर्ग संघर्षाची चिथाबाजी नव्हे उलथून टाका आणि विनाश करा ही द्वेषजन्य थोडक्यात बहुतेक मान्यताप्राप्त मानवतावाद हे माणसाला व्यक्तीकेंद्रीत करून त्या-त्या आर्थिक, सामाजिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक परिस्थितीशी संघर्ष किंवा विन्मुख होणाऱ्या गोष्टी करतात या सगळ्या पार्श्वभूमीवर पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानवतावाद मात्र संघर्ष नव्हे तर समन्वयाची प्रेरणा देतो. विभिन्नतेनुसार एकतेचा मंत्र देतो.

पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचा जीवन परिचय :-

पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचा जन्म 26 सप्टेंबर 1916 रोजी झाला असून, त्यांचा मृत्यू दि. 11 फेब्रुवारी 1968 रोजी झाला. पंडीत दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे विचारवंत आणि संघटक होते. भारतीय जनसंघाचे अध्यक्षही होते. भारताची सनातन विचारधारा वयोमानानुसार मांडत त्यांनी देशाला अखंड मानवतावाद नावाची विचारधारा दिली.

ते सर्वसमावेशक विचारसरणीचे समर्थक होते. ज्यांना एक मजबुत आणि सशक्त भारत हवा होता. राजकारणाव्यतिरिक्त त्यांना साहित्याचाही प्रचंड रस होता. त्यांनी हिंदी आणि इंग्रजी भाषेमध्ये अनेक लेख लिहिले जे विविध वृत्तपत्रे आणि मासिकांमध्ये प्रसिद्ध झाली. सर्वसमावेशक विकास म्हणजे काळानुसार कुठल्याही गोष्टीवर होणारा गुणात्मक, प्रकाशात्मक किंवा दर्जात्मक आधिक्य विकास होय. उदा. अर्थव्यवस्था प्रणाली इत्यादीमध्ये होऊ शकतो. सध्या तो ठराविक एकतेचा प्रतिक मोजता येत नाही. काळानुसार आधिक्य होणे व प्रमाणात्मक व गुणात्मक विकास घडवणे तितकेच महत्त्वाचे ठरते. व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, विश्व

म्हणजेच व्यक्तीबरोबर कुटुंबाचा विकास होतो. कुटुंबाचा विकास झाला की, राष्ट्राचा विकास होतो. राष्ट्राचा विकास झाला की देशाचा विकास होतो.

एकात्म मानव दर्शनाचा अर्थ मानवी जीवनासोबतच संपूर्ण विश्वाच्या एकात्म संबंधचा दर्शवतो. मानवी जीवनातील विविध अंगे आणि मानवी प्रकृती/विश्वाच्या विभिन्नतेमध्ये विविधता आहे. परंतु ही विविधता आंतरिक एकतेच्या विभिन्न रूपांनी अभिव्यक्त आहे.

एकात्म मानवतावाद व्यक्ती जीवनाच्या सर्व अंगाना केंद्रीत करून संकलित विचार करते. मानवी शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा ही संकलित रूपे आहेत. मानवाचा सर्वांगीण विचार त्याच्या शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा संकलित विचार आहे. व्यक्तीचे चार पुरुषार्थ आहेत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरुषार्थांचे घनिष्ट संबंध आहेत. हे चार पुरुषार्थ व्यक्तीच्या, शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आत्मीक आवश्यकतांना पूर्ण करतात. या चार पुरुषार्थांची व्यक्तीच्या संपूर्ण विकासासाठी खूप आवश्यकता आहे. भारतीय संस्कृती या चार पुरुषार्थाने बनलेली आहे.

धर्म व्यक्तीच्या नैतिक रूपाचे व निदर्शनाचे कार्य करते. धर्माच्या आधारावर अर्थ आणि काम पुरुषार्थ व्यक्ती मोक्षाला प्राप्त करण्यास ही सरला आहे. या पुरुषार्थांपासून त्याला सुखाची प्राप्ती होती. या पुरुषार्थामध्ये कोणतेही स्वतंत्र पुरुषार्थ नाही हे सर्व एक दुसऱ्यास पूरक आहे.

अध्ययन विषयाची निवड :-

साधारणपणे अर्थशास्त्र विषयामध्ये आर्थिक विचारवंतांचा आणि आर्थिक बाबीचा अभ्यास केला जातो. वेगवेगळया अर्थशास्त्रज्ञाची वेगवेगळया संकल्पना,

सिद्धता मांडलेले आहेत. प्रस्तुत अभ्यासात संशोधनाचे तपशील व वर्णन केले जाईल आणि सध्याच्या काळात पंडित दीनदयाल यांनी जगाला 'एकात्म मानवतावाद' ही संकल्पना दिली ज्यामध्ये त्यांनी व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, सृष्टी, परमेष्टी हे एकमेकांवर अवलंबून आहेत. या सर्वांचा विकास एकमेकांवर अवलंबून आहे. यामध्ये त्यांनी जगाला 'अंत्योदय' ही संकल्पना दिली. याचा अभ्यास आपण करणार आहोत. एकात्मता मानवतावादातून सर्वसमावेशक विकास कसा होतो हे आपण अभ्यासणार आहोत.

सर्वसमावेशक विकासाची व्याख्या व अर्थ :-

सर्वसमावेशक विकास ही प्राचीन संकल्पना आहे. सर्वसमावेशक विकासाचे निकष व एकात्म मानवतावादातील चतु:सुत्री यांच्यामध्ये सहसंबंध आहे. सर्वसमावेशक विकास व्यक्तीच्या सर्वांगीण बाबीचा विकास होय. व्यक्तीचा सामाजिक, आर्थिक, मानसिक, भावनिक विकास होणे म्हणजे विकास होय. पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या एकात्म मानवतावाद सिद्धांतातून आपल्याला असे दिसून येते की, व्यक्तीचा विकास झाला की, कुटुंबाचा विकास होतो, कुटुंबाचा झाला की, समाजाचा विकास होतो, समाजाचा झाला की राज्याचा विकास होतो आणि राज्यातून देशाचा होतो. व 'वसुधैवकुटुम्बकम् ' म्हणजे सर्वांचा खऱ्या अर्थाने विकास होतो.

एकात्म मानवतावादातील सर्वसमावेशकाची सुत्रे :

उपाध्याय यांच्या मते समाजवादी आणि पुंजीवादी विचारधारा केवळ मानवाच्या शरीरावर आणि मनावर विचार करतात. मानवाच्या संपूर्ण विकासासोबत आत्मिक विकास ही खूप आवश्यक आहे. एकात्म मानवतावाद ही अशी विचारधारा आहे की, ज्यामध्ये केंद्रस्थानी व्यक्ती, व्यक्तीसोबत त्याचे कुटुंब,

कुटुंबांनी बनलेला समाज, राष्ट्र, विश्व आणि ब्रह्मांड समाविष्ट आहे. या सगळयांचा क्रमीत विकास होय.

सकारात्मक मानवतावादाचे दर्शन व्यक्ती, परिवार, समाज, राष्ट्र, विश्व आणि ब्रह्मांड या सर्वांचे एकत्रित विकास व विचार करते. मानवी जीवनाचे ध्येय म्हणजेच पुरुषार्थ धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थंचे पूर्ण मानव एकात्म मानव दर्शनचे केंद्रबिंदू आहे. एकात्म मानवतावाद व्यक्ती व समाजाच्या बंधनावर, आधारावर व त्याची आवश्यकता आणि कार्यशील रेखाचित्र, समाज व्यक्ती आणि स्तंभ यावर अवलंबून आहे. एकात्म मानवतावादाची प्रासंगिकता एकत्रित आणि संधारणीय आहे. व्यक्ती आणि समाजाच्या आवश्यकतेला संतुलित करते. प्रत्येक मानवाच्या गनिमय जीवन सुनिश्चित करते. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक लोकतंत्र आणि स्वातंत्र्याला पुढे नेण्याचे कार्य करते. विविधतेला प्रोत्साहन देणे, अंत्योदय, समाजातील खालच्या दर्जाचे लोकांचे जीवन सुधारणे, राष्ट्राची एकात्मता आणि अखंडता जपणे, विश्वबंधुत्व 'वसुधैव कुटुम्बकम्' ही संकल्पना यातून दिसून येते.

संशोधनाची गृहितके :-

1) सर्वसमावेशक विकास ही आधुनिक नाही तर प्राचीन संकल्पना आहे.

2) सर्वसमावेशक विकास विचार भारतीय वैचारिक दर्शनाचा भाग आहे.

3) सर्वसमावेशक विकास व एकात्म मानवतावाद विचार यांचा सहसंबंध आहे.

4) एकात्म मानवतावाद विचारातील अंत्योदय व सर्वसमावेशक विकास संकल्पना यांचा संबंध आहे.

5) सर्वसमावेशक विकास ही संकल्पना मानवतावाद विचार यांच्याशी पूरक आहे.

6) एकात्म मानवतावाद विचारातील उद्योग व कृषीविषयक विचार व सर्वसमावेशी विकास यांचा संबंध आहे.

म्हणून खऱ्या अर्थाने सर्वसमावेशकाचे सूत्र आहे म्हणून एकात्म मानवतावाद प्रारुप आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1) सर्वसमावेशक विकास ही संकल्पना प्राचीन संकल्पना आहे हे आजमावणे.

2) भारतीय आर्थिक व सामाजिक विचारातील सर्वसमावेशकाचे विचार शाश्वत आहेत हे पडताळणे.

3) सर्वसमावेशक विकास व एकात्म मानवतावाद यांच्यातील साधर्म्य शोधणे.

4) अंत्योदय ही एकात्म मानवतावादातील संकल्पना सर्वसमावेशक विकासाशी पूरक आहे हे सिद्ध करणे.

5) सर्वसमावेशक विकासाचे निकष व एकात्म मानवतावादातील चतु:सुत्री यांच्यातील संबंध शोधणे.

6) एकात्म मानवतावाद विचारातील उद्योग व कृषीविषयक विचार व सर्वसमावेशी विकास यांचा संबंध लक्षात येतो.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनात द्वितीयक स्वरुपाची माहिती एकत्रित करून संशोधन केले जाणार आहे. प्रस्तुत संशोधनाचा प्रकार हा वर्णनात्मक आहे. अर्थशास्त्रीय संशोधनात तथ्य संकलनाचा दुय्यम स्त्रोत महत्त्वाचा आहे. संशोधक प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रात जाऊन माहिती संकलित करीत नसतो. इतर व्यक्तीने प्रकाशित केलेल्या माहितीचा उपयोग करत असतो. प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा देखील

अवलंब केला जातो. पुस्तक हे संदर्भग्रंथ, सांख्यिकीय माहिती, अहवाल, मासिके, पुस्तके, वर्तमानपत्रे, इंटरनेटनी केलेले संशोधन अहवाल इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्रकरणे :-

प्रकरण पहिले : प्रास्ताविक

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : एकात्म मानवतावादातील अंत्योदय संकल्पना

प्रकरण चौथे : एकात्म मानवतावादातील कृषीविषयक विचार

प्रकरण पाचवे : सर्वसमावेशक विकास एकात्म मानवतावाद विचारांची प्रासंगिकता

प्रकरण सहावे : निष्कर्ष

(संशोधनाला जसजशी गती येईल तसतसे संशोधन आराखड्यात थोडाबहुत बदल संभवतो.**)**

संदर्भग्रंथसूची :-

1. पंडित उपाध्याय दीनदयाळ, "एकात्म दर्शन", दीनदयाळ शोध संस्था, नई दिल्ली.

2. पंडित उपाध्याय दीनदयाळ, “एकात्म दर्शन”, सुरुचि प्रकाशन, केशव कुंज, नई दिल्ली.

3. कुलकर्णी शरद आनंद, “एकात्म अर्थनीति”,

4. शर्मा महेशचंद्र, दीनदयाळ उपाध्याय एवं विचार वसुधा पब्लिकेशन

5. राष्ट्रीय जीवन माला, पंडित दीनदयाळ उपाध्याय

6. भारतीय राजनेती में, पंडित दीनदयाळ उपाध्याय, डॉ.मनिषा डुबे, संजय डुबे.

7. पंडीत दीनदयाळ उपाध्याय विचार दर्शन, एकात्म अर्थनीती, कुलकर्णी शरद आनंद

8. आधुनिक भारत के निर्माण, पंडीत दीनदयाळ उपाध्याय, शर्मा महेशचंद्र.

9. Social Political & Economic Idea of Deendayal Upadhyay, A Study of Intorgal humanism Himachal.

10. Builders of Modern India Pandit Deendayal Upadhyay, Mahesh Chandra Sharma

11. पाटील व्ही.बी., 2023, संशोधन पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

12. घाटोळे रा., 2007, समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे आणि पद्धती,

13. आगलावे प्रदीप, 1999, सामाजिक संशोधन पद्धती आणि तंत्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

14. देशमुख ए.एम., संशोधन पद्धती, प्रशांत प्रकाशन, जळगाव.

मार्गदर्शक
डॉ.दुर्गादास चौधरी
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
जि.लातूर

संशोधक
राधेशाम बाबुलाल बुंदेलकर
सामाजिक शास्त्रे संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड